|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.1**

जळगाव दि. २० ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेतून प्राचार्य एल.पी.देशमुख आणि प्रा.नितीन बारी हे आज दि.२० फेब्रुवारी रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत निवडून आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी अधिसभेची पहिली बैठक झाली. या बैठकीत प्राचार्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर खुल्या प्रवर्गातून निवडून देण्याच्या एका जागेसाठी आणि अध्यापकांमधून खुल्या प्रवर्गात निवडून दयावयाच्या एका जागेसाठी निवडणूक झाली. प्राचार्यांमधून एल.पी.देशमुख (नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव) आणि प्राचार्य आर.एस.पाटील (पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा) हे दोन उमेदवार उभे होते. बैठकीत ५६ अधिसभा सदस्यांनी मतदान केले. त्यामध्ये चार मते बाद झाली. ५२ मते वैध ठरली. त्यापैकी निवडून येण्यासाठी २७ मतांचा कोटा निर्धारित करण्यात आला. प्राचार्य एल.पी.देशमुख यांना प्रथम पसंतीची ४१ मते प्राप्त झाली. तर प्राचार्य आर.एस.पाटील यांना ११ मते प्राप्त झाली. प्राचार्य देशमुख यांना अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्यांमधून विजयी झाल्याचे यावेळी घोषित करण्यात आले.

अध्यापकांसाठी झालेल्या ५६ मतदानापैकी एक मत बाद झाले. ५५ पैकी विजयासाठी २८ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला. प्रा.नितीन बारी यांना पहिल्या पसंतीची ३८ मते तर प्रा.संजय सोनवणे यांना १७ मते प्राप्त झाली. प्रा.नितीन बारी यांना अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर शिक्षकांमधून विजयी घोषित करण्यात आले.

अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्यांमधून ओबीसी संवर्गातून प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे), अध्यापकांमधून अनुसूचित जमाती प्रवर्गातून प्रा.मोहन पावरा (एसएसव्हीपीएस कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे), व्यवस्थापन प्रतिनिधींच्या खुल्या संवर्गातून डॉ.सुभाष चौधरी (जळगाव), नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधींच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातून विवेक लोहार आणि खुल्या संवर्गातून दीपक पाटील हे पाच जण व्यवस्थापन परिषदेवर बिनविरोध निवडून आल्याचे यावेळी सभागृहात घोषित करण्यात आले.

अभिसभेच्या आजच्या बैठकीत तक्रार निवारण समितीवर अध्यापकांमधून प्रा.एकनाथ नेहते, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधून गिरीष पाटील यांची बिनविरोध निवड झाली. तर स्थायी समितीवर प्राचार्यांमधून अनिल लोहार, शिक्षकांमधून डॉ.के.जी.कोल्हे, पदवीधरांमधून नितीन ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली. विद्या परिषदेवर अधिसभेतून व्यवस्थापन प्रतिनिधीच्या गटातून सौ.पूनम गुजराथी यांची बिनविरोध निवड आजच्या बैठकीत करण्यात आली.

आजच्या अधिसभेच्या बैठकीत कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी प्रारंभी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत करताना विद्यापीठाच्या विकासात अधिसभेच्या सर्व सदस्यांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करुन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नावलौकिक उंचावण्यासाठी सगळे मिळून प्रयत्न करुयात अशी भावना व्यक्त केली. प्रारंभी तुषार सराफ, मु.ब.शहा आणि विद्यापीठ कर्मचारी हिंमत पाटील यांना सभागृहाने श्रध्दांजली अर्पण केली. बहुसंख्य अधिसभा सदस्य नवीन निवडून आलेले असल्यामुळे त्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे असा ठराव यावेळी काही सदस्यांनी मांडला. कुलगुरुंच्या संमतीने हा ठराव मान्य करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले.

..2..

## Public Relations Office जनसंपर्क विभाग



**बातमी क्र.2**

जळगाव दि.२० (प्रतिनिधी) : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयडीयल विभागाद्वारे एम.ए.शिक्षणशास्त्र आणि एल.एल.एम. विद्यार्थ्यांसाठी आयोजित संपर्कसत्राचा समारोप कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या उपस्थितीत १८ फेब्रुवारी रोजी झाला.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षक्रमांना एकूण ३१२ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यातील व्यावसायिक शिक्षणक्रम एम. ए. शिक्षणशास्त्र व एल.एल.एम. शिक्षणक्रमांतर्गत दर रविवारी याप्रमाणे दहा दिवसांचे संपर्क सत्र घेण्यात आले होते. सदर सत्रात विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक व अध्ययन विषयक समस्या सोडविण्यासाठी विषयनिहाय संमंत्रक येत असतात. दि. १८ फेब्रुवारी रोजी सत्राचा समारोप पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू प्रा. पी. पी. पाटील तर प्रमूख अतिथी म्हणून कुलसचिव बी.बी.पाटील उपस्थित होते.

विभागाचे संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी प्रास्ताविक केले. कुलगुरू प्रा. पी.पी.पाटील यांनी बाहेरून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयडीयल विभागाचे महत्व सांगताना काम करता करता शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम महत्वाचा आहे. भावी काळात विभागाद्वारे विविध कौशल्ययुक्त प्रमाणपत्र, पदविका शिक्षणक्रम सुरू केले जाणार असून विभागाचे स्वरूप पूर्णपणे बदलले जाणार असल्याचे प्रतिपादन केले.

कुलसचिव बी.बी.पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. संपर्कसत्र दरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडवण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या संमंत्रक मार्गदर्शिकेचे प्रकाशन कुलगुरूच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार सहायक प्रा.मनिषा जगताप यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. युवाकुमार रेड्डी, डॉ. विजेता सिंग, प्राचार्य डॉ. जयश्री नेमाडे सहायक प्रा. सीमा बारी हया संमंत्रकांची उपस्थिती होती.

---

**बातमी क्र.3**

जळगाव दि. २० ( ) विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रांतर्गत कार्यरत हिन्दी विभागाच्या वतीने व विद्यापीठाच्या संशोधन व विकास विभागाच्या आर्थिक सहयोगाने गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी 'हिंदी मानक वर्तनी एवं मुद्रित शोधन 'या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे .

सदर कार्यशाळेचे उद्‌घाटन गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी डॉ.शीतलाप्रसाद दुबे, समन्वयक महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांच्या हस्ते व डॉ.कामिनी तिवारी अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र हिंदी प्राध्यापक परीषद, जळगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यशाळेमध्ये डॉ.केशरीलाल वर्मा पूर्वनिर्देशक केंद्रीय हिंदी निर्देशालय, नवी दिल्ली व विभागाध्यक्ष साहित्य व कला भवन, पंडीत रवीशंकर शुक्ल विश्वविद्यालय, रायपुर यांचे 'देवनागरी लिपी तथा हिंदी वर्तनी का मानकीकरण' या विषयांवर डॉ.उमाशंकर उपाध्याय पूर्व विभागाध्यक्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे 'हिंदी व्याकरण एवं वर्तनीगत अशुध्दियाँ ' या विषयांवर डॉ.मेघा आचार्य, व्यवसायिक मद्रीत शोधक ,महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय विश्वविद्यालय, वर्धा यांचे 'मुद्रीत शोधन की तकनिकी प्रविधि एवंम प्रक्रीया 'या विषयावर व्याख्यान होणार आहे.

सदर कार्यशाळेमध्ये एक सत्र हे 'प्रूफ रिडींग प्रात्यक्षिकांचे ' घेण्यात येणार आहे. त्यासाठी कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी/प्राध्यापकांनी स्वलिखीत दोन पृष्ठ (शब्द संख्या मर्यादा ३००) लिहून सोबत आणावयाचे आहे. या कार्यशाळेत हिंदी विषयाच्या विद्यार्थी /प्राध्यापकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यशाळेचे संयोजक व हिंदी विभाग प्रमुख डॉ.सुनील कुलकर्णी, प्रशाळेचे संचालक डॉ.म.सु.पगारे इंग्रजी विषयांच्या विभागप्रमुख डॉ.मुक्ता महाजन यांनी केले आहे.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय/2018 दिनांक : 20 फेब्रुवारी, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

जनसंपर्क अधिकारी